**वाचले :-**

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०११ मधील सुधारीत तरतूदी.

२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/ १६-ब, दिनांक ०७ मे, २०२१

३. महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग चार-ब,माघ२९ शके १९४१ दि. १८/०२/२०२०

४. पदोन्नती समिती सभा दिनांक ०४/१०/२०२४ चा सभावृत्तांत.

५. मा.आयुक्त सो यांचा दिनांक ०८/१०/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८, सामान्य प्रशासन विभाग
क्र.सा.प्र.वि/३/कावि/१५३१/२०२४
दिनांक : ०८/१०/२०२४

**विषय :- 'मुख्य आरोग्य निरीक्षक' पदावरील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर **'मुख्य आरोग्य निरीक्षक'** या अभिनामाची पदे **पे लेवल एस-१५ वेतनश्रेणी र.रु. ४१८००-१३२३००** या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. त्यापैकी रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी दिनांक ०४/१०/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व **'आरोग्य निरीक्षक'** या पदावरील कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, संगणक अर्हता, मत्ता व दायित्व, आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादी सेवाविषयक तपशिल पडताळून, खालील कर्मचा-यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन तसेच दिनांक ०७/०५/२०२१ रोजीचे शासन निर्णय तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार 'मुख्य आरोग्य निरीक्षक' या पदावर पे लेवल एस-१५ वेतनश्रेणी र.रु. ४१८००-१३२३०० वेतनश्रेणीत पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे.

| अ.क्र | आरोग्य निरीक्षक पदाची दि.०१/०१/२०२४ अखेरची अंतिम स्वरुपाची सेवाज्येष्ठता सूचीमधील क्र. | कर्मचा-यांचे नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | १० | श्री.इंगेवाड सतिश माधवराव | ज्येष्ठतेनुसार |
| २ | ११ | श्री.मोरे शशिकांत शिवाजी | ज्येष्ठतेनुसार |
| ३ | १२ | श्री.गणगे दत्तात्रय उत्तरेश्वर | ज्येष्ठतेनुसार |
| ४ | १४ | श्री.घाटे शंकर पांडुरंग | ज्येष्ठतेनुसार |

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व दि. ७/०५/२०२१ चे शासन निर्णयास अधिन तसेच सदर पदोन्नती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१, रिट पिटीशन क्र.(स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट पिटीशन क्र. ४२०७/२०१३ व मे. दिवाणी न्यायालय आकुर्डी येथे रे.दावा नं.११/२०१७ मध्ये होणा-या निर्णयाच्या अधिन राहून उपरोक्त नमूद

कर्मचा-यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार **'मुख्य आरोग्य निरीक्षक'** या पदावर **पे लेवल एस-१५ वेतनश्रेणी र.रु. ४१८००-१३२३००** या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे. तसेच उपरोक्त नमूद कर्मचा-यांना आरोग्य मुख्य कार्यालयात पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत असून संबंधित विभागप्रमुखांनी त्यांना सविस्तर कामकाज वाटप करावे.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

प्रति,
संबंधित कर्मचारी
प्रत-
१) लेखा विभाग २) लेखापरिक्षण ३) सामान्य प्रशासन टेबल क्रमांक ९, १०, १२, १४, संगणक कक्ष
४) पिं.चिं.म.न.पा कर्मचारी महासंघ ५) पिं.चिं.म.न.पा कर्मचारी सेवकांची सह.पतसंस्था
६) सर्व संबंधित विभाग

**(किरणकुमार मोरे)**
सहाय्यक आयुक्त, साप्रवि
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८